माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ५७५/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री. देवेंद्रसिंह व्दा. बैस,**

--विरुध्द--

**जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक,**
भुमी अभिलेख कार्यालय, आर्वी ता. आर्वी जि. वर्धा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपअधिक्षक,**
भुमी अभिलेख कार्यालय, आर्वी ता. आर्वी जि. वर्धा

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २१.०६.२०२३**

**तक्रारकर्ता** : अनुपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| २८.११.२०१८ | --- | २०.११.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २७९१/२०१८ मध्ये दिनांक २८.११.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २१.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपअधिक्षक भूमी अभिलेख, आर्वी, जि. वर्धा, श्रीम. विना आर. बारापात्रे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपअधिक्षक भूमी अभिलेख, आर्वी, जि. वर्धा श्री. भिमराव मोतीरामजी नान्ने उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २७९१/२०१८ मध्ये दिनांक २८.११.२०१८ रोजी सुनावणी घेवून " सदर महसूली प्रकरणावर उपायुक्त महसूल, नागपूर विभाग, नागपूर यांनी आदेश पारित करून उपअधिक्षक, भुमी अभिलेख, वर्धा यांचेकडे पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित केलेले आहे. परंतु ही कार्यवाही अद्याप अपूर्ण असल्याचे दिसून येत आहे. कार्यालयाने प्राप्त अर्जावर नियमांनुसार विहीत कालमर्यादेत प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. याकडे

जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, वर्धा यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागितलेल्या माहितीस अनुसरुन जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध माहिती पुरविलेली असल्याने, " असे आदेशित करून प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २०.११.२०१९ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. २७९१/२०१८ मध्ये दिनांक २८.११.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर आदेशाचे अवलोकन केले असता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना पुरविली असल्याचा निष्कर्ष काढून अधिक्षक, भुमी अभिलेख, वर्धा , उपायुक्त, महसुल, नागपूर विभाग, उपसंचालक भुमी अभिलेख, नागपूर प्रदेश नागपूर यांच्याकडे अग्रेषित करून कार्यवाही अपूर्ण असल्यास प्रक्रिया पूर्ण करण्याचे वरील आदेशात नमूद करून वरील अपिल अर्ज निकाली काढला असल्याचे आढळून येते.

त्याअनुषंगाने तत्कालिन उप आयुक्त (महसूल), नागपूर विभाग, नागपूर यांनी दि. ०८.०६.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशात, नमूद केल्याप्रमाणे सदर प्रकरण अधिक्षक, भुमी अभिलेख, वर्धा यांचेकडे फेरतपासणी व जमिनीची फेरमोजणी क्षेत्र व नकाशा दुरुस्तीची कार्यवाही करावी, असे आदेशित केले. ही बाब लक्षात घेता, उपअधिक्षक, भुमी अभिलेख, आर्वी येथील कर्मचारी /अधिकारी यांनी कार्यवाही केली असून, अपिलार्थी यांनी केलेल्या आरोपात तथ्य नसल्याने त्रुटी पूर्तता होवून नियमानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत दक्षता घेत असल्याचा दि. १३.०६.२०१८ रोजी खुलासा सादर केला आहे. अपिलार्थी यांना मौजा माळेगाव (ठेडा) तलाठी साझा क्र. ३३ भु.क्र. ५७/२ आराजी ५.४२ हे आरच्या अराजी पुरक, नकाशा दुरुस्ती व हद्द कायम करणेबाबत महसूली यंत्रणेव्दारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल खुलासा दि. २८.०१.२०१९ रोजी प्रदान केला आहे. आयोगाच्या दि. २८.११.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीत नमूद केल्याप्रमाणे कार्यालयाने प्राप्त अर्जावर नियमानुसार विहीत कालमर्यादेत प्रक्रिया पूण करणे आवश्यक आहे, ही अधोरेखीत बाब कालमर्यादेत पालन करून त्यावर योग्य तो निर्णय प्रचलित नियमावली व शासकीय धोरणानुसार घेवून अपिलार्थीस आयोगाचे सदर आदेश प्राप्त होताच तात्काळ सूचित करण्याच्या सूचनेसह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** २१.०६.२०२३

**जा.क्र.** 6462 **दि.** 4 DEC 2023

E:\SS \A Part तक्रार 21.06.2023\575-2019 दव्रदासिंह बैस.docx